# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी – 22620601, 22690602, 22641150/51, फॅक्स – 22692102.
E-mail : desk10@dtemaharashtra.gov.in Internet : www.dtemaharashtra.gov.in


**परिपत्रक**

क्रमांक : 10/एनजीपी/एआयसीटीई/2017-18/प्र.वाढ/ ३०१०
दिनांक : 12 JAN 2017

**विषय : शैक्षणिक वर्ष 2017-18 पासून पदविका अभ्यासक्रमांच्या संस्थेत नवीन अभ्यासक्रम सुरु करणे, सुरु असलेल्या अभ्यासक्रमात प्रवेशक्षमता वाढ इ. करीता प्रस्ताव सादर करण्याबाबत...**

**संदर्भ : अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांची जाहिरात क्रमांक : ॲप्रुव्हल/12(11)/2016.(लोकसत्ता दिनांक : 2.1.2017).**

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचेमार्फत संदर्भाधीन जाहिराती अन्वये शैक्षणिक वर्ष 2017-18 करीता परीषदेमार्फत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या वेब पोर्टलवरील ॲप्रुव्हल प्रोसेस हँडबुक 2017-18 मधील मार्गदर्शक सूचनांनुसार ऑन लाईन पध्दतीने दिनांक 5.1.2017 ते दिनांक 4.2.2017 या कालावधीत पदविका अभ्यासक्रमांच्या संस्थामधील ज्या अभ्यासक्रमांना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या ॲप्रुव्हल प्रोसेस हँडबुक 2017-18 मध्ये नमूद केल्याप्रमाणे **एनबीए (National Board of Accreditation, New Delhi) कडून वैध** ॲक्रिडीटेशन प्रमाणपत्र प्राप्त झालेले आहे अशा पदविका अभ्यासक्रमाच्या सुरु असलेल्या संस्थांनी संस्थेत नवीन अभ्यासक्रम सुरु करणे, सुरु असलेल्या अभ्यासक्रमात प्रवेशक्षमता वाढ इ. करीता प्रस्ताव संस्थांकडून अर्ज मागविण्यात आलेले आहेत.

सदर जाहिरातीच्या अनुषंगाने पदविका व्यावसायीक अभ्यासक्रमांच्या सर्व संस्थांना कळविण्यात येते की, पदविका अभ्यासक्रमांच्या ज्या अभ्यासक्रमांना **एनबीए (National Board of Accreditation, New Delhi)** कडून ॲक्रिडीटेशन प्रमाणपत्र प्राप्त झालेले आहे किंवा अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या ॲप्रुव्हल प्रोसेस हँडबुक 2017-18 प्रमाणे पात्र अशा पदविका अभ्यासक्रमाच्या सुरु असलेल्या संस्थांनी संस्थेत नवीन अभ्यासक्रम सुरु करणे, सुरु असलेल्या अभ्यासक्रमात प्रवेशक्षमता वाढ इ. बाबत संस्थांनी परिषदेकडे सादर केलेल्या अर्जांवर शासनाचे अभिप्राय/ शिफारस परिषदेस सादर करण्याकरीता, संबंधीत संस्थांना या संचालनालयाच्या संकेतस्थळावर माहिती भरण्याकरीता लिंक स्वतंत्रपणे उपलब्ध करुन देण्यात येईल. सदर लिंकवर या संचालनालयामार्फत देण्यात आलेला सांकेतांक (संस्थेचा डिटीई कोड) व पासवर्ड व्दारे ऑनलाईन माहिती अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या संकेतस्थळावर भरल्यानंतर तात्काळ या संचालनालयाच्या संकेतस्थळावर भरावी. या संचालनालयाच्या संकेतस्थळावर माहिती भरण्या करीता **लिंक दिनांक 4.2.2016 पर्यंत किंवा अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेमार्फत वेळोवेळी अद्ययावत करण्यात येणाऱ्या अंतिम दिनांकापर्यंतच** सुरु राहिल.

नवीन अभ्यासक्रम सुरु करणे, सुरु असलेल्या अभ्यासक्रमात प्रवेशक्षमता वाढ इ. करीता प्रस्ताव सादर करतांना शैक्षणिक वर्ष 2017-18 साठीचा जिल्हानिहाय बृहत आराखडा विचारात घेण्यात यावा. सदर बृहत आराखडयाची प्रत या संचालनालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. ज्या संस्थामार्फत संचालनालयाच्या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने माहिती भरण्यात येईल अशा संस्थांनाच सुनावणीकरिता बोलाविण्यात येईल. तसेच अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या निर्देशांनुसार संस्थेमध्ये राबविण्यात येत असलेल्या पदविका अभ्यासक्रमांना एनबीए (National Board of Accreditation, New Delhi) कडून वैध ॲक्रिडीटेशन प्रमाणपत्र प्राप्त झालेले आहे किंवा अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या ॲप्रुव्हल प्रोसेस हँडबुक 2017-18 प्रमाणे पात्र अशा संस्थांनीच नवीन अभ्यासक्रम सुरु करणे, सुरु असलेल्या अभ्यासक्रमात प्रवेशक्षमता वाढ इ. करीता या संचालनालयाच्या अभिप्रायांसह शासनामार्फत परिषदेस अभिप्राय/ शिफारस सादर करण्यात येईल. सुनावणी बाबतचे वेळापत्रक वेळोवेळी या संचालनालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल. तसेच संबंधीत संस्थांनी, संबंधीत तंत्रशिक्षण विभागीय

सहसंचालक तंत्रशिक्षण
प्रादेशिक कार्यालय, नागपूर

कार्यालयाकडे, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण 2013/प्र.क्र.43/तांशि-4, दि. 21.8.2013 मध्ये नमूद विहित शुल्क भरल्याची पावती, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेचा ऑनलाईन अद्ययावत नो-डेफिशिअन्सी रिपोर्ट (प्राचार्यांनी प्रमाणित केलेला,), परिषदेस सादर केलेल्या सहपत्रांसह अर्ज, संस्था प्रमुखांनी प्रमाणित केलेले ॲनेक्चर "सी" व "डी" (प्रपत्र)(संचालनालयाच्या संकेतस्थळावर माहिती भरल्यानंतर निर्माण होणारे ) व सक्षम प्राधिकरणाने प्रमाणित केलेला जागा/ बांधकाम/ इमारतीचे नकाशे, ऑक्युपेन्सी प्रमाणपत्र इ. बाबत सोबत जोडलेल्या ॲनेक्चर "ई" (सोबत जोडल्याप्रमाणे) प्रपत्रातील माहिती, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाची समसत्रातील ॲकेडमीक मॉनेटरींग रिपोर्टची प्रत व अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेस ऑनलाईन सादर केलेल्या प्रस्तावाच्या 2 प्रतींसह तसेच संबंधीत कागदपत्रांसह सुनावणीकरीता संस्थेतील जबाबदार व्यक्ती (प्राचार्य किंवा संस्थेचे अध्यक्ष/ सचिव यापैकी एक अनिवार्य) यांनी संचालनालयामार्फत विहीत केलेल्या सुनावणीच्या दिनांकांस उपस्थित राहणे आवश्यक राहील, याची नोंद संबंधीत संस्थांनी घ्यावी.

(डॉ. सुभाष महाजन)
संचालक, तंत्रशिक्षण, म.रा.,मुंबई

प्रत : माहिती व कार्यवाहीसाठी.

१. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती/ औरंगाबाद/ मुंबई/ नागपूर/ नाशिक/ पुणे त्यांना कळविण्यात येते की, सदर बाब आपल्या अखत्यारीतील उपरोक्त प्रस्ताव सादर केलेल्या सर्व व्यावसायिक **पदविका अभ्यासक्रम राबविणाऱ्या संस्थांच्या निदर्शनास आणून देण्यात यावी.**
२. कार्यासन क्रमांक3 (आयटीसेल), मुख्य कार्यालय, मुंबई (सदरचे परिपत्रक संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.)
३. कार्यासन क्रमांक 13 (नोंदणीशाखा), मुख्य कार्यालय, मुंबई त्यांना कळविण्यात येते की, **सदर प्रस्ताव संबंधीत** विभागीय कार्यालयांनी स्विकारावयाचे असल्याने याबाबतचे प्रस्ताव संचालनालयात स्विकारण्यात येवू नये.
४. निवडनस्ती

पृष्ठांकन/तशिस/विकाना/शैवि/प्र.वाढ/2017/217
दिनांक:- 27 JAN 2017

प्रति,
प्राचार्य,सर्व पदवीका संस्था,
नागपूर विभाग,
नागपूर.

उपरोक्त पत्रात नमुद केल्या प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
नागपूर

## Annexure E

### On letter head of Architect

This is to certify that the total carpet area of (Institute name) building constructed on property bearing (Survey No. etc ) of village/ city/ town at ---------------- is -------------- $m^2$. Including the Circulation area & other area required for operation of the college is mentioned below is ready.

| Sr.No. | | No. | Total Area in $m^2$ |
|---|---|---|---|
| 1 | Class room | | |
| 2 | Tutorial Room | | |
| 3 | Laboratory | | |
| 4 | Work Shop | | |
| 5 | Additional work shop lab/ for category 'x' | | |
| 6 | Computer centre | | |
| 7 | Drawing Hall | | |
| 8 | Library & reading room | | |
| 9 | Seminar Room | | |
| 10 | Faculty Room | | |
| 11 | Instructional Area | | $m^2$ |
| 12 | Administrate Area | | $m^2$ |
| 13 | Amenities Area | | $m^2$ |
| 14 | Circulation Area | | $m^2$ |
| 15 | Total carpet up Area | | $m^2$ |
| 16 | Any other | | $m^2$ |

Seal

Signature of Architecture

Registration No.